सं.क्रि.केस क्र. २७८७/२०२५
शासन -वि- विठठल
न्यायनिर्णय
नि.क्र. ०६ लगत

MHYA050047812025

दाखल तारीख – १२/१२/२०२५
नोंदणी तारीख – १२/१२/२०२५
निकाल तारीख – १३/०८/२०२६
कालावधी – ००व. ०८ म. ०१ दि.

# न्यायनिर्णय

(दिनांक १३/०८/२०२६ रोजी जाहिर केला)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई अन्वये चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचा आणि आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असुन त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणांसह नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १२/११/२०२५ रोजी १०.३० वाजताच्या सुमारास मारवाडी, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे आरोपीने त्याच्या मातोश्री धाब्याच्या पाठीमागच्या बाजुला देशी दारु टॅागो पंचच्या ९० मि.ली. ४५० नग किंमत १८,०००/– व देशी दारु बॅाबी संत्राच्या ९० मि.ली. ३०० नगर एकूण किंमत १२०००/– असा एकूण ३००००/– रुपयाचा मुद्देमाल अवैधरीत्या बाळगतांना मिळुन आला व त्याद्वारे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसार शिक्षापात्र गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |

# कारणमिमांसा

## मुद्दा क्र. १ करीता

३. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार क्र. १ रामेश्वर तारासिंग चव्हाण हे घटनास्थळ जप्ती पंच असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत पोलिसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. तसेच पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहित नाही असे सांगुन अभियोग पक्षास मदत केली नाही. सदर साक्षीदाराने पोलिसांनी त्यांचे समक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षाच्या उपयोगाची नाही.

४. सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीविरूध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आणु शकला नाही. सदर प्रकरणात रासायनिक विष्लेषणाचा अहवाल दाखल केला नसल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

५. अभिलेखावरील पुराव्यावरून असे दिसुन येते की सदर प्रकरणामध्ये साक्षीदाराने अभियोगपक्षास मदत न केल्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ जप्ती पंचनाम्यातील मजकुर सिध्द करू शकला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त झाला हे अभियोगपक्ष सिध्द करू शकला नाही. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाने जप्त दारूचा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही आणि त्याबाबत कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. सरकार पक्षाने

आरोपीविरूध्द घटनेसंबंधी कोणताही विश्वासार्ह प्रत्यक्ष अथवा परीस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आणला नाही. त्यामुळे अभियोगपक्ष हा आरोपीविरुध्दचा गून्हा निसंशयीतरित्या सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी हे सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करीता**

**६.** मुद्दे क्र. १ चे नकारार्थी निष्कर्षानुसार आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरले आहे. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून मातोश्री धाब्याच्या पाठीमागच्या बाजुला देशी दारु टॉगो पंचच्या ९० मि.ली. ४५० नग किंमत १८,०००/– व देशी दारु बॉबी संत्राच्या ९० मि.ली. ३०० नगर एकूण किंमत १२०००/– असा एकूण ३००००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर दारू ही आव्हानीत कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक पुसद यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठवुन देणे न्यायोचित होईल. प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द आव्हान करणेकामी आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये रक्कम रूपये १५,०००/– चे बंधपत्र व जातमुचलका देण्याचे निर्देष देण्यात आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. आरोपी विठ्ठल परशराम जामकर यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसारचे गुन्ह्यामधुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.



न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल दारू अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क अधिका–यांकडे नियमाप्रमाणे नष्ट करण्याकरीता देण्यात यावा.

४. आरोपी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे जमानतीची पूर्तता करावी.

दिनांक – १३/०८/२०२६

**(जी. जी. चोंडे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पुसद**

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Jt. C.J.J.D.and J.M.F.C, Pusad |
| Date of Signature of Presiding Officer | 13/08/2026 |
| Date of Judgment Uploaded | 13/08/2026 |

दिनांक – १३/०८/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी–१, यवतमाळ.
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पूसद,